# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा नयाकुंड येथे दि. २५/०७/२२ चे २१.३० वा. ते २२.१५ वा. दरम्यान आरोपी नामे– परशुराम मखजु गौतम, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ शिवनगर कांद्री, कन्हान याने आपल्या ताब्यातील एमएच– ४०/ए.के– ७७४० क्रमांकाच्या महींद्रा बोलोरा पिकअप गाडी मध्ये दगडी कोळसा अंदाजे १५०० किलो (दीड टन) कि. १०,०००/–रू. चा चोरून वाहतुक करून घेवुन जातांना मिळुन आला. आरोपी कडुन वाहनासह एकुण २,१०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रभाकर झोड पो.स्टे पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी सुचनापत्रावर रिहा असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रवि चौधरी मो.क्र. ९५११२७३६८१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील गुमथी वार्ड क्र. १ येथे दि. २५/०७/२२ चे २०.०० वा. ते दि. २६/०७/२२ चे ०५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुमेध विठ्ठलराव मानवटकर वय ४८ वर्ष, रा. गुमथी यांची गुमथी शिवारात शेती असुन त्यांच्याकडे असलेले ४ बैल व ०४ गायी नेहमी शेतातील खुल्या गायीच्या गोठयात बांधुन ठेवले असतात. फिर्यादी हे सकाळी नेहमी प्रमाणे शेतातील गायीचा गोठयात गेला असता फिर्यादीला गोठयातील ४ बैलापैकी ३ पांढरे गैल किमती ३०,०००/–रु. व ०४ गाइ पैकी १ लाल गाय किमती १२,०००/–रु. असा एकुण ४२,०००/–रु. चे जनावरे अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रभाकर झोड पो.स्टे खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते मो.नं. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील प्रगती नगर कन्हान येथे दि. २५/०७/२२ चे २१.४५ वा. ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोहीत सुधाकर बोरीकर (जखमी), वय २२ वर्ष, रा. प्रगतीनगर, कन्हान हा डब्बा देण्याचे काम करतो. फिर्यादी व फिर्यादीचे दोन भाउ गणेश नगर येथील येरकरयांच्या घरी किरायाणे राहणारा आरोपी नामे– साजीद शेख वय २५ वर्ष, रा. गणेश नगर, कन्हान याच्या घरी डब्बा देण्याकरीता गेले होते व जेवणाचे एक महिण्याचे २०००/–रू. एडवांस मागितले. तर यावर आरोपीने आपल्या पॅन्ट मधिल खिश्यातुन एक चाकु काडुन फिर्यादीच्या पाटीला मारायला मागुन आला परंतु फिर्यादीने त्याचा हात पकडुन आपला जिव वाचवण्याचा प्रयत्न करू लागला. यावर आरोपीने फिर्यादीच्या गालावर वार करून जखमी केले. त्यामुळे जखमीच्या गालातुन रक्त निघाले तसेच जखमीचे खालच्या बाजुचे दात तुटला आहे व उपचार घेवुन रिपोर्ट दिली असता सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि श्री फुलझेले मो.न. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणी फाटा चंदा बियरबार येथे दि. २६/०७/२२ चे २१.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरज देवराव ताजणे वय २७ वर्ष रा.वार्ड नं २ उबाळी यांचे भाउ पंकज व त्याचे मित्र हे सर्व मिळुन कळमेश्वर ला गेले होते. त्यादरम्यान फिर्यादीच्या भवाला आरोपी नामे– १. राजेन्द्र विनायकराव गोतमारे, वय २७ वर्ष, रा. इंदिरा नगर, वार्ड क्र. १२ कळमेश्वर, २. आशिष माणीकराव चव्हाण, वय २८ वर्ष, रा. इंदिरा नगर, वार्ड क्र. १२ कळमेश्वर व ३. नंदकिशोर कृष्णाजी देवघरे, वय २२ वर्ष, रा. इंदिरा नगर, वार्ड क्र. १२ कळमेश्वर यांनी संगनमत करून किरकोळ कारणावरून फिर्यादीच्या भावाला चंदा बार कळमेश्वर येथे हातबुक्कीने मारहाण केली. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या भावाला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. उपचाराचे कागदपत्र प्राप्त झाल्याने फिर्यादीचे भावाचे छातीजवळ मार लागुन दोन ते तिन बरगळया फॅक्चर झाल्याची माहीती डॉक्टरांनी कागदपत्रात दिल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री पाली सा मो नं ९२८४३५४६३० हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी**:– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील केदार कॉलनी टेंभरी येथे दि. २४/०७/२२ ते दि. २५/०७/२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरविन्दर बहादूरसिंग कलसी वय ३९ वर्ष, रा. १२ सेक्टर एफ सिडको कॉलनी बुटीबोरी ता. जि.नागपुर याने आपली एम.एच–४०/झेड–६०२५ क्रमांकाची काळया रंगाची पल्सर मोटरसायकल ही त्याचा मित्र नामे– सुनिल शर्मा रा. टेभंरी याला त्याचेकडे गाडी नसल्याने त्याला डयुटीवर जाणे करीता दिली होती. फिर्यादी चा मित्र याने डयुटी वरून परत येवून सदर मोटरसायकल ही आपले रूमचे समोर ठेवली असता अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमती १०,०००/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोउपनि श्री अशोक तरमळे मो. क्र. ९९२३६९९१८५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**